॥ ॐ ॥

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यवृत्त

नोव्हेंबर
२०२१


२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११.

(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४     भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६

Email : wardhinee@gmail.com


Website : http://www.swaroopwardhinee.org


पद्मविभूषण, महाराष्ट्र भूषण, लेखक, इतिहासकार,

**शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे (बळवंत मोरेश्वर पुरंदरे)**

यांना

## ॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥



...दोस्ताने हाक मारली, की मग झटपट सर्वांचा
निरोप घेऊन दोस्ताबरोबर कायमचे निघून जायचे.
या दोस्ताचे नाव मृत्यू! हा दोस्त रंगरुपाने फार भेसूर दिसतो.
सगळे भितात त्याला. पण तो फार प्रेमळही आहे.
सर्व यातनांतून मनुष्याला एका निमिषात सोडविण्याचे सुखदायक
सामर्थ्य त्याच्या हाकेत असते...

- राजा शिवछत्रपती (शिवचरित्रातून)

# शाखा विभाग



कोविडच्या दोन लाटानंतर वर्धिनीच्या मूळ कामाच्या चिंतानासाठी शाखा-उत्थान-युवा विभागाने शनिवार, दि. १६ ऑक्टोबरला 'कोविड काळातील संधी व कामासमोरील पुढील आव्हाने' याविषयी शैक्षणिक परिसंवाद घडवून आणला. यात पुढील विषय मांडले गेले व चर्चा झाली.

१. वर्धन कृतीपुस्तिका विश्लेषण - पुस्तिकेने नक्की काय साधले, व पुढील वाटचाल.

२. दहावी बोर्ड निकाल व सद्य तासिका प्रक्रिया, शिक्षणात पडलेला खंड कसा भरून काढावा?

३. जीवित ध्येय व करिअर निश्चिती संदर्भात मांडणी

४. आरोग्य शिबिरे- निष्कर्ष, पुढील आव्हाने व नियोजन

५. जन्मशताब्दी प्रगतीपालक संकल्प- आगामी दिशा

सर्व सादरकर्त्यांनी संख्यात्मक आणि गुणात्मक विश्लेषण मांडले. काही यशस्वी कथा त्यात सांगण्यात आल्या. निश्चित ध्येयाला पोहचू न शकल्याची कारणे काय? विशेष काय प्रयत्न करावे लागतील ? यावर चर्चा झाली. या परिसंवादाचा समारोप कार्यवाह विश्वास कुलकर्णी सरांनी केला.



**नवरात्र विशेष** - दि. ७ ऑक्टोबरला घटस्थापनेच्या निमित्ताने स्वामी दयानंद सरस्वती शाखेत आदित्य घोरपडे दादाने 'महिला सशक्तीकरण' हा विषय मांडला. तसेच खंडेनवमीच्या दिवशी शस्त्रपूजनाचा कार्यक्रम पार पडला. समर्थ रामकृष्ण शाखेने अंकूर संस्थेच्या संस्थापिका मा. माधुरी देशपांडे ताईंच्या हस्ते शाखेतील क्रीडा साहित्याचे पूजन केले व ताईंनी मुलांना कर्तृत्ववान स्त्रियांची माहिती सांगितली.



- **कोजागिरी विशेष** - यावर्षी कोजागिरी पौर्णिमा अनेक शाखांमध्ये उत्साहात साजरी झाली. स्वामी ब्रह्मानंद शाखेतील सोहम दादाने कोजागिरी पौर्णिमेचे महत्त्व सांगितले. स्वामी दयानंद शाखेत पद्य मैफिलीने कोजागिरीचा प्रारंभ झाला. यावेळी मुलांशी संवाद साधण्यासाठी चेतन दादा आणि अनेक व्यावसायिक युवक उपस्थित होते. समर्थ रामकृष्ण शाखेने मुलांना टेलिस्कोपच्या माध्यमातून आकाशदर्शन घडवले. यासोबतच नरवीर तानाजी मालुसरे शाखा, स्वामी सुबोधानंद शाखा यांनीही कोजागिरीच्या चंद्रप्रकाशात दुग्धपानाचा आस्वाद घेतला.



नरवीर तानाजी मालुसरे शाखेने धायरी भागात महानगर पालिकेतर्फे आयोजित स्वच्छता अभियानात सहभाग घेतला. पथनाट्य, पोस्टर्स याद्वारे जनजागृती करण्यात आली. राजर्षी शाहू शाखेने ३० ऑक्टोबरला चांदणी भोजन आयोजित केले होते. सदर कार्यक्रमात 'शक्ती बुद्धी' हा खेळ झाला. त्यानंतर सरदार उधमसिंह हा चित्रपट दाखवण्यात आला. दुसऱ्या दिवशी सकाळी उपासना आणि मैदानानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

स्वामी दयानंद सुपर लीग या किल्ले बांधणी स्पर्धेचे श्री. निशिकांत वाईकर सरांनी प्रतिकृती, नाविन्य, सजावट, माहिती या मुद्द्यांद्वारे परीक्षण केले.

धर्मवीर शंभूराजे शाखेने २३ ऑक्टोबर या दिवशी छत्रपती शिवराय या विषयावर श्री. चिंचकर सरांचे व्याख्यान आयोजित केले. ३१ ऑक्टोबरला शाखेची सहल ५६ संख्येनिशी सिंहगडावर गेली. श्री. संभाजी डिंबळे यांनी गडाचा इतिहास सविस्तर उलगडून सांगितला. स्वामी श्रद्धानंद शाखेमध्ये १५ ऑक्टोबरला समूहगीत गायन स्पर्धा घेण्यात आली. दसऱ्याच्या दिवशी शुभेच्छा देण्यासाठी वस्ती संपर्क करण्यात आला.









# युवा विभाग



वक्तृत्व कार्यशाळा २०२१
दिनांक :- ९ ऑक्टोबर २०२१
संख्या :- २१

श्री. ज्ञानेश पुरंदरे वक्तृत्व करंडक स्पर्धेमधील विजेते व पहिली फेरी पार करणाऱ्या, तसेच इतर इच्छूक स्पर्धकांसाठी आयोजित या वक्तृत्व कार्यशाळेमध्ये प्रशिक्षक म्हणून श्री.मिलिंद वेर्लेकर यांनी मार्गदर्शन केले. गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड होल्डर असणाऱ्या सरांनी आतापर्यंत हजारो व्याख्याने दिली आहेत. सरांच्या मार्गदर्शनातील काही विशेष नोंदी

- आपण ज्या विषयावरती बोलणार आहे त्याची पूर्वतयारी करणे.
- वक्त्याकडे नाविन्य आणि कल्पनाशक्ती हवी. त्याला गोष्टीची, कथेची, विचारांची कल्पना करता आली पाहिजे.
- The strongest person of the world is story teller - Steve Jobs
- वक्त्याकडे आत्मविश्वास हवा आणि हा आत्मविश्वास सरावाने प्राप्त करता येतो.
- Speaking या शब्दातच 'KING' हा शब्द आहे. मंचावर गेला की त्याने राजाप्रमाणे श्रोत्यांचे विश्व ताब्यात घ्यावे.
- भाषण संपताच वक्त्याने विद्यार्थी व्हावे व नम्रता दाखवावी. नम्र व प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न वक्त्याने केला पाहिजे.



- वक्त्याची निरीक्षणशक्ती त्याला अनेक विषय मिळवून देते किंवा त्याला अनेक कथा देते. त्यामुळे निरीक्षण शक्ती

  सर्वोत्तम करण्याचा प्रयत्न वक्त्याने केला पाहिजे.
- Polish copper shines more than raw gold. म्हणून सतत स्वतःला पॉलिश म्हणजे चकाकी दिली पाहिजे.
- वक्ता वाचनाने घडतो, समृद्ध होतो, म्हणून रोज किमान दहा पाने वाचली पाहिजेत.



**गुण गौरव सभारंभ -**

सन २०२० - २१ या शैक्षणिक वर्षामध्ये उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या वर्धिनीमधील ११ वी ते महाविद्यालयीन गुणवंत युवांचे कौतुक व त्यांच्या पुढील वाटचालीस प्रेरणा देण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन शनिवार दि. ३० ऑक्टोबरला करण्यात आले. सदर कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. प्रियांका बेहेरा (DRECTOR, RSB FOUNDATION) आणि श्री. प्रियदर्शन सहस्रबुद्धे सर (IIT BOMBAY) उपस्थित होते.

प्रियांका ताईंनी मार्गदर्शन करताना जीवनामध्ये शैक्षणिकदृष्टचा किंवा आर्थिकदृष्ट्या यशस्वी व्हायचे असेल तर कष्टाशिवाय पर्याय नाही असे सांगितले.



तसेच जागतिक स्तरावर काम करत असतानाचे त्यांचे काही अनुभव युवकांसमोर मांडले.

दुसरे प्रमुख मार्गदर्शक प्रियदर्शन सहस्रबुद्धे यांनी भारतासमोरील तांत्रिक, सामाजिक आणि आर्थिक आव्हाने कोणती आहेत हे सांगितले. या आव्हानांपैकी एक 'इंधन समस्या' यावर कचऱ्यापासून इंधन निर्मिती कशी केली याविषयीचे अनुभव मांडले. एकूण उपस्थिती : ९०.

- **दिवाळी व्याख्यान -**

दिवाळीनिमित्त युवा विभागातर्फे दि. ६ नोव्हेंबर या दिवशी 'विज्ञान - तंत्रज्ञान संधी व आव्हाने' या विषयावर श्री. अतुल कहाते यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. विज्ञानाच्या प्रगतीमुळे भविष्यामध्ये समाजावरती कोणत्या अडचणी येणार आहेत हे त्यांनी उदाहरणासह समजावून सांगितले. मोबाईलच्या अतिवापराचे वाईट परिणाम, काळानुरूप होणारे विविध बदल व त्या संबंधित नोकऱ्या, कमी होत जाणाऱ्या रोजगार संधी अशा अनेक समस्या आणि त्यावरील उपायही सांगितले; जसे की सुशिक्षित होणे, सुसज्ज होणे, नियमित पुस्तक वृत्तपत्रांचे वाचन करणे व अनेक विषयांवर संशोधन करणे. या व्याख्यानाचा लाभ प्रत्यक्ष उपस्थित राहून व दूरदृष्य प्रणालीद्वारे अनेक कार्यकर्ते, हितचिंतक, विद्यार्थी यांनी घेतला.

# उत्थान विभाग

■ **कार्यकर्ता सहल -**

विभागातील प्रमुख कार्यकर्त्यांची सहल २६ सप्टेंबरला निळकंठेश्वर व पानशेत धरण येथे नेण्यात आली. कार्यकर्ता गटाची संघटना बांधणी व प्रेरणा जागरण या प्रमुख उद्देशाने या सहलीचे आयोजन करण्यात आले. सकाळी वर्धिनीतून निघाल्यानंतर निळकंठेश्वरचा डोंगर एकत्रितपणे सर केला.

निळकंठेश्वरच्या मंदिरात उपासना झाली. तेथील प्राचीन काळातील मूर्त्यांची माहिती घेतली. नवीन कार्यकर्त्यांचा हा पहिलाच अनुभव असल्याने पद्य मैफिल, अभ्यासिका गुणवत्ता वाढीसाठी चर्चा, विविध खेळ यांच्या माध्यमातून उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न केला. निळकंठेश्वरचा परिसर फिरून झाल्यानंतर खाली उतरून पानशेत धरणाकडे निघालो. पानशेत धरणाचा परिसर फिरत असताना श्री. निलेश धायरकर सरांनी भाग प्रमुखांशी अभ्यासिका, कामातील अडचणी व उपाय यावर चर्चा केली.

■ **कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग -**

मासिक प्रशिक्षणात स्मरणशक्ती या विषयाला अनुसरून उपक्रम घेऊन अभ्यासिकेतील मुलांमध्ये स्मरणशक्ती वाढवण्यासाठी कोणकोणत्या पद्धतीने उपक्रम घेता येतील यावर चर्चा झाली. जास्तीत जास्त वस्तूंची यादी करणे, ठिकाणाचे वर्णन व त्या ठिकाणी असलेल्या सजीव-निर्जीव वस्तूंची यादी, उतारा वाचन आणि आकलन याविषयी उपक्रम घेण्यात आले. वर्धन कृती पुस्तिका वाटप आणि प्रतिसाद वाढीसाठी प्रयत्न यावरही चर्चा घेण्यात आली. सदर प्रशिक्षण सौ. कोमल धायरकर आणि गौरी शिंदे यांनी घेतले.

गणेश उत्सवानिमित्त उत्थान विभागातील चालणाऱ्या अभ्यासिकेमध्ये गणेश मूर्ती तयार करण्यात आल्या. विशेष म्हणजे स्वतः बनवलेली बाप्पाची मूर्ती घरी घेऊन जाऊन त्याची प्राणप्रतिष्ठा करून, सजावट करून गणेश उत्सव साजरा केला.

■ **राजमाता जिजाऊ अभ्यासिका -**

गणेशोत्सवात विविध स्पर्धा व उपक्रम घेण्यात आले. मुलांनी आईच्या मदतीने मोदक बनवून त्यांचा बाप्पाला नैवेद्य दाखवला. टाकाऊ पासून टिकाऊ या उपक्रमात तुटक्या बाटल्या, घरातच पडलेल्या बांगड्या, पुठ्ठा, काडेपेट्या, अशा विविध टाकाऊ वस्तूंपासून मुलांनी स्टेशनरी होल्डर, अगरबत्ती स्टँड, फुलांची परडी, विंड चाईम अशा आकर्षक वस्तू तयार केल्या. **'आमच्या या सवयी घेऊन जा बाप्पा' - या अनोख्या उपक्रमात मुलांनी स्वतःमधील वाईट सवयी बदलण्याचा संकल्प पानावर लिहून, बाप्पाच्या हाताला बांधल्या व मूर्ती विसर्जन केली.**

■ **शिवरत्न अभ्यासिका - कुंभार वाडा**

१५ सप्टेंबर रोजी मुलांची 'खाना खजाना' स्पर्धा घेण्यात आली. त्या दिवशी शिवरत्न अभ्यासिकेचे पालक श्री. सुनिल शिराळे आणि पंचशीलचे अभ्यासिका पालक श्री. कृष्णा शिवले यांनी अभ्यासिकेला भेट दिली.

■ **महाराणा प्रताप अभ्यासिका -**

ऑक्टोबर महिन्यात कृती पुस्तिकेमधील let's take challenge आणि गट अभ्यासिका या दोन उपक्रमांना उत्तम प्रतिसाद मिळाला. दिवाळीच्या वेळेस आपण आपले घर साफ करतो तशीच अभ्यासिका सर्व मुलांनी मिळून साफ केली.

■ **प्रियदर्शनी अभ्यासिका -**

मासिक पाळी बाबत होणारे गैरसमज दूर करणे, मासिक पाळी विषयी माहिती देणे, विषय मोकळेपणाने बोलण्यासाठी प्रवृत्त करणे या उद्देशाने लोकबिरादरी संस्थेच्या मदतीने दोन भागांमध्ये सत्र घेण्यात आले. खेळ, गप्पा, प्रश्नोत्तर, संवाद अशा प्रत्येक गोष्टींमधून मासिक पाळी विषय मांडणी झाली. दुसऱ्या टप्प्यात या सत्रामधून जे समजले ते नाटक स्वरूपात बसवून सादर केले. **अनेक मुलांनी प्रतिक्रियांमध्ये यापुढे मी आईला समजून घेईन, ताईला त्रास देणार नाही, त्यांना मदत करीन असं लिहिलं.**









# समुपदेशन विभाग



▪ लोकबिरादरी मित्रमंडळ ट्रस्ट, समाज बंध आणि समुपदेशन विभाग संयुक्तरित्या दि. १६ ऑक्टोबरला महिला विभागाच्या रुग्ण सहाय्यक वर्ग आणि शिवण वर्गाच्या मुलींसाठी 'मासिक पाळी' या विषयावर जागरण सत्र घेतले. सत्राची सुरवात स्व-परिचयाच्या खेळांनी झाली. चित्रफितीतून मासिक पाळी कशी होते, शरीरातील बदल मुलींना समजले. प्रश्नोत्तरातून मासिक पाळी सुरु झाल्यावर होणारे मानसिक आणि भावनिक बदलांना सकारात्मकतेने सामोरे जाण्याचे मार्ग सर्वांना लक्षात आले. यासाठी आपल्या आहाराकडे आपण लक्ष दिले पाहिजे, मासिक पाळी ही नैसर्गिक आहे, त्याकडे शास्त्रीय दृष्टीकोनातून बघितले पाहिजे यावर विशेष चर्चा झाली.

▪ सुपर १६ बॅच - ११ वी-१२ वी तील निवडक मुलांच्या **शारीरिक तंदुरुस्तीची चाचणी** दि. १८, १९ ऑक्टोबरला युवा कार्यकर्ते सुदीप सुभेदार आणि जितेंद्र काळे यांच्या सहकार्याने झाली. आरोग्याचे महत्त्व सांगताना ते म्हणाले, 'कुठल्याही यशाचे शिखर गाठायचे असेल तर आपले आरोग्य उत्तम असले पाहिजे. त्यासाठी आपली दिनचर्या, व्यायाम, आणि आहार याकडे नीट लक्ष दिले पाहिजे.'



या मुलांना वैयक्तिक समुपदेशन करण्यासाठी विभागाच्या सदस्यांनी मुलांची नावे निश्चित करून गृह संपर्काने सुरुवात करण्याचे ठरले.

दि २० ऑक्टोबरला युवा कार्यकर्ता व यू.पी.एस.सी.परीक्षेत निवड झालेल्या पार्थ कश्यप दादाचे मार्गदर्शन सत्र झाले. दादाने **'वर्धिनी ते परीक्षा'** हा प्रवास मांडला. तो म्हणाला, 'मंदार पोफळे दादामुळे मी वर्धिनीत आलो. पडलो-झडलो तरी पुढे जायचे, आपणहून जबाबदारी स्वीकारल्यावर कुठल्याही परिस्थितीत ती पूर्ण करायची, कॉलेज-शाखा आणि स्वत: ठरवलेले ध्येय गाठण्यासाठी उत्तम नियोजन करायचे हे सर्व वर्धिनीतून शिकायला मिळाले. आवडीचे स्पर्धा परीक्षा क्षेत्र निवडल्यावर त्यात झोकुन दिले. खूप वाचन केले, त्याची टिपणे काढायची सवय लावून घेतली. मोबाइलसाठीचा वेळ निश्चित केला. वर्धिनी आपल्याला अनेक संधी उपलब्ध करून देते त्या संधीचं आपण सोनं केलं पाहिजे.'



**'I can I will'** या विषयावर वर्धिनीचे उपाध्यक्ष श्री. शिरीष पटवर्धन सरांचे दि. २ नोव्हेंबरला मार्गदर्शन सत्र झाले. ते म्हणाले, 'I will या विचाराने आपण आपल्या क्षमता जाणून घेतो. त्यातून आपली खरी ओळख होते. I can do it, I will do it, मी करून बघेल, मला जमेल हा विचार प्रत्येक बाबतीत असला पाहिजे. कुठल्याही कामाला होकार असणे हा Yes, I can चा पहिला टप्पा असतो. I will मुळे दृढ विश्वास जागा होऊन अनेक पुढचे मार्ग आपल्याला दिसतात. आपण किमान पर्यंत न थांबता कमाल पर्यंत पोचायचं आहे हे ठरवले पाहिजे. पराक्रम हा असाध्य गोष्टीतच घडत असतो. शिवाजी महाराजांनी तहात बावन्न किल्ले दिले पण ते मी निश्चित परत मिळवेन या आत्मविश्वासावरच. आपल्या आव्हानांना आपणच उत्तर शोधायचे असते, नकारात्मक विचारांनी चुकीचा मार्ग दिसतो. **'साधारण' कार्य सभी करते है। 'असाधारण' है, इसलिए करने लायक है असा विचार करायला आपण शिकलं पाहिजे**'.

▪ बुद्धिमापन चाचणी - दि २१ ऑक्टोबरला वर्धिनीच्या ओमकार सभागृहात भगिनी निवेदिता आणि सावित्री शाखेच्या एकूण २९ मुलींची व दि ९ नोव्हेंबरला स्वामी श्रद्धानंद शाखेतील २७ मुलांची घोरपडे उद्यानात चाचणी झाली. चाचणीनंतर वाचन का केले पाहिजे यावर मुलांशी सवांद झाला.

▪ पालक कट्टा - व्याख्यान - मा. वैशाली देशमुख.

दि. ९ नोव्हेंबरला १० वीतील मुलांच्या पालकांसाठी 'पाल्याची दहावी आणि पालकांची भूमिका' या विषयावर वैशालीताईंनी मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, 'मुलांचे आयुष्य म्हणजे नुसता अभ्यास, आकडेमोड नाही. त्यांचे मन, भावना जपल्या पाहिजेत. एका विषयाच्या अभ्यासाला मुलांना किमान ५० मिनिटं अशीच वेळ द्यावी. त्यानंतर अभ्यास करताना मेंदूला ताण येतो. म्हणून मेंदूचे मनोरंजन अभ्यासातील बदलाने करता येते. या करिताही वेळ ठरवून द्यावी. मुलांना सतत अभ्यासाच्या तणावाखाली न ठेवता, परीक्षेची भीती न दाखवता त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. मुलांचा आहार, व्यायाम हाही महत्त्वाचा आहे.'



## पद्मश्री गिरीश काका प्रभुणे यांच्यासोबत भेट व गप्पा.

वर्धिनीच्या युवा गटाने २१ ऑक्टोबरला पुनरुत्थान समरसता गुरुकुलम येथे भेट देऊन काकांना जन्मदिनाच्या शुभेच्छा दिल्या. प्रेरणादायी व शैक्षणिक चिंतनाला प्रोत्साहन देणारी ही भेट ठरली. सहकार्यवाह पुष्पाताई नडे यांनी त्यांचे रेखाचित्र व कार्यवृत्त काकांना भेट दिले.

– काकांनी त्यांचे शिक्षणातील कार्यरूपी चिंतन सर्वांच्या समोर मांडले.

– आपल्याला वंचित समाजाला सद्यस्थितीच्या मुख्य प्रवाहात आणायचे की मूळ प्रवाहात आणावे यावर त्यांनी संवाद साधला.

– वंचित समाजाला मूळ प्रवाहाला जोडणे म्हणजे विकास अशी आपण व्याख्या करायला हवी असे मत त्यांनी मांडले.





## युवा अभ्यास वर्ग

विषय – वर्धिनी विचार व जीवित ध्येय,
स्थळ – बाल शिशु विहार विद्यालय, एरंडवणे, पुणे
वर्ग कालावधी – दि. १ ते ३ ऑक्टोबर,
वर्ग प्रमुख – आकाश देशमुख

बुद्धिमत्ता समाजाच्या सर्वच स्तरात असते हा विश्वास मनी बाळगून या बुद्धिमत्तेला योग्य संधी आणि पोषक वातावरण देऊन समाजाचे नेतृत्व करतील असे संवेदनशील सेवेकरी घडवण्याचे स्वप्न वर्धिनी बाळगते.

खेळ, कार्यक्रम, स्पर्धा, शिबिर, तासिका, चांगले मित्र अशा अनेक निमित्तांनी युवा वर्धिनीच्या शाखेत येतात. काही काळानंतर आपली शाखा आणि वर्धिनी ही एक ध्येय आणि विचार घेऊन मार्गक्रमण करत आहे याची जाणीव युवांना होते.

या प्रवासात वर्धिनी विचार म्हणजे नक्की काय, विकसित होऊन कशासाठी अर्पित व्हायचे आहे, माझे करिअर मी कसे ठरवावे, जीवित ध्येय म्हणजे काय या अनेक प्रश्नांना उत्तरे मिळावी यासाठी या कार्यकर्ता अभ्यास वर्गाचे आयोजन करण्यात आले.

- **उद्घाटन सत्र –** मा. शिरीष पटवर्धन सरांनी दि. १ ऑक्टोबरला वर्गाचे उद्घाटन करताना अभ्यास वर्गाची संकल्पना स्पष्ट केली. ते म्हणाले, 'शाखा चालवताना अनेक अडचणी येतात. त्यांच्यावरती मात करायची असेल तर त्या अडचणींचा आधी अभ्यास करणे गरजेचे आहे. दररोज शाखा घेण्यासाठी आधी त्याची तयारी करायला पाहिजे. शाखेवर नव-नवीन उपक्रम राबवत असताना आपण सर्वांनी परिस्थितीचा अंदाज घ्यायला पाहिजे व त्यावर एक टीम म्हणून संघ म्हणून काम केलं पाहिजे. त्यासाठी आपण अभ्यास वर्गासाठी जमलो आहोत. वर्धिनीचे ध्येय गाठण्यासाठी काळानुसार कामात ही बदल केला पाहिजे. त्यासाठी ही नवी अभ्यास वर्गाची संकल्पना राबवत आहोत. स्वयंसेवक वेगवेगळ्या वयाचे, क्षेत्रातील आणि त्यांचे अनुभव कथन या अभ्यास वर्गातील मुख्य हेतू असणार आहे. अभ्यास वर्ग हा शाखेसाठी आणि स्वतःमध्ये विकास घडवून आणण्यासाठी आहे.'
- **सत्र – दुसरे,** वक्ते – मा. कैलास

सोनटक्के, विषय - वाद संवाद आर्थिक संपन्नता आणि सामाजिक काम.

ते म्हणाले, 'आर्थिक प्रगतीपेक्षा आर्थिक स्थिरता अधिक महत्त्वाची आहे. आपण गटाने - TEAM म्हणून काम करतो.

**T - Together, E - Everyone, A - Achives, M - More.** एकी असेल तर शाखेतील सर्व काम उत्तम व नियोजनबद्ध होते. शाखेतील या सवयी वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात सुद्धा उपयोगी पडतात. शाखा तंत्र आणि मंत्र स्वयंसेवक घडवते. या स्वयंसेवकांनी मानसिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासावर भर दिला पाहिजे. पण त्यासोबत आपल्या वेळेचा उपयोग सामाजिक कामासाठी केला पाहिजे.'



- **सत्र तिसरे,** वक्ते - मा. रामभाऊ डिंबळे, विषय - जीवित ध्येय का ? कशासाठी ?

'चुकीचे आदर्श डोळ्यासमोर ठेवून नको त्या व्यक्तींबद्दल आपण त्यांच्यासारखं व्हावं असं वाटणं गैर आहे. आपण प्रत्येकजण अनुभवाने गोष्टी वेचतो, फक्त योगायोगाने त्या स्वीकारत नाही. योजणे, वेचणे, सोसणे यातून मनासारख्या गोष्टी घडून येतात. पण काहीजण प्रवाहाविरुद्ध वाहणारे बदल घडवून आणतात. शिक्षण परिवर्तनाचे वेड घेऊन लोकमान्य टिळक, आगरकर अशा महापुरुषांनी काम केले. त्याची फळं आज आपण चाखत आहोत.

मनावर संस्कार असे असावेत की ठरविणे, वेचणे, मग काम करणे हे कृतीत यावं. यासाठी तपस्वी व्यक्तींचा प्रभाव पडणे महत्त्वाचे. अनेक थोर व्यक्तींना भेटायला पाहिजे. आयुष्यात नवीन प्रेरणेचा स्रोत शोधायला पाहिजे. स्वरूपाचा परीघ वाढवला पाहिजे. भेटी घेतल्या पाहिजेत. समाजाचे निरीक्षण व स्वपरीक्षणही महत्त्वाचे आहे. ह्या गोष्टी वैयक्तिक आयुष्यात व संस्था संघटनांच्या वाढीसाठी महत्त्वाच्या आहेत. काही शैक्षणिक संस्था आर्थिकदृष्ट्या सधन झाल्या तर काही संस्था, शाळा आपल्या मूळ विचाराशी जोडून कार्यरत राहिल्या आहेत. परम वैभवासाठी नवीन कार्यकर्त्यांनी नवीन कल्पना शोधाव्यात व त्याप्रमाणे काम करावे.





- **सत्र चौथे,** वक्ते - विजय नवले, विषय - मार्ग तयाला मिळती सत्तर...!

इतके वाचावे, इतके अनुभवावे आणि एक दिवस स्वतः लिहिते व्हावे. यातून पुढची वाटचाल होत रहाते. काम करताना जितकी बिकट परिस्थिती तितका संघर्ष अधिक, पण त्यातच आयुष्याची मजा आहे. स्वतःच्या प्रेरणेतून मिळालेले उत्तर हे श्रेष्ठ आणि चिरकाल टिकणारे असते. आपल्या आयुष्यातील करिअर हा एक खूप छोटा भाग असतो पण ते साधताना आयुष्य घडणं हा मूळ उद्देश विसरता कामा नये. कौशल्य आणि आवड ह्या दोन वेगळ्या गोष्टी असल्या तरी त्यांची सांगड घालता यायला हवी. आपल्या अपयशाचं खापर परिस्थितीवर फोडू नये, नकारात्मक विचार करू नये आणि बोलू नये. आपली सकारात्मकताच आपल्यातील स्वयंप्रेरणा टिकवून ठेवते.

- **सत्र पाचवे,** सुरेश पवार दादानी तत् किम् या गीताचा अर्थ व चाल समजून सांगितली. आयुष्यात यश, संपत्ती, भौतिक सुख हे सर्व प्राप्त झाल्यानंतर आपल्या हातून राष्ट्रसेवा घडत नसेल तर हे सर्व व्यर्थ आहे हा विचार या पद्यातून युवांपर्यंत पोहोचवला.

- **सत्र सहावे,** विषय - Needs, Wants and Requirement, वक्ते - मा. विलास कुलकर्णी



गरज, इच्छा आणि आवश्यकता यातील मुख्य फरक विविध उदाहरणांच्या माध्यमातून सरांनी समजावून सांगितले. हा विचार वैयक्तिक व सामाजिक आयुष्यात मोलाचा आहे.

- **सत्र सातवे,** विषय - वर्धिनी विचार, वक्ते - श्री. चेतन कुसाळकर

संघटन आणि नेतृत्व हा विषय विविध खेळांच्या माध्यमातून युवकांपर्यंत पोहोचवला. त्यामध्ये ५ जणांचा, २० जणांचा, ४० जणांचा अशा क्रमाने गटातील सदस्य संख्या वाढवून खेळ घेण्यात आले आणि नेतृत्व व संघटन यातील निर्णयामध्ये झालेला बदल चर्चासत्राच्या माध्यमातून मांडण्यात आला.

- **सत्र आठवे,** विषय - पूर्ण वेळ काम करताना मज उमगलेली वर्धिनी, वक्ते - संजय तांबट

निवडक मुलांना घेऊन किशाभाऊंनी काम सुरू केले. पुढे त्याच निवडक वर्धकांनी हे काम वाढवले. व्यवधानं आणि साधनं वाढल्यामुळे परिस्थितीत मोठा फरक पडला. वर्धिनीचे युवक अनुभवातून शिकतात आणि त्याचं आकलन करून सुधारणाही करतात. स्वतःतील सद्गुणांचे वर्धन आणि दुर्गुणांचे निर्मूलन हेच खरे स्वरूपाचे वर्धन आहे. 'तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला' प्रार्थनेचे ३ रे चरण हे आपल्या कार्याशी निगडीत आहे. कार्यकर्ता हा नुसता सांगकाम्या नसावा त्याने स्वयंप्रेरणेने, विचाराने कार्य करावे. अहंकार हा कार्यकर्त्याला संपवतो म्हणून सर्वांच्या मताचा, विचारांचा आदर कार्यकर्त्याने केलाच पाहिजे. कर्तृत्वाला समर्पणाची जोड हवी. कुठल्याही कामात सर्वस्व झोकून काम करणे हेही समर्पण आहे.

- **सत्र नववे,** विषय - राष्ट्रासमोरील आव्हाने

श्री. चंदन हायगुंडे (लोकशाही जागर मंच) यांनी या सत्रात राष्ट्रासमोरील विविध

आव्हानांविषयी चर्चा घडवून आणून यावरील उपाय म्हणून संविधानाचे महत्त्व सांगितले.

- **समारोप सत्र,** वक्ते – मा. विश्वास कुलकर्णी

जीवित ध्येय ही व्यापक संकल्पना अनुभवी कार्यकर्त्यांच्या मुलाखतीतून स्पष्ट झाली. सेवेतून सेवेकरी घडवणे या वर्धिनीच्या भूमिकेविषयी विश्वास सरांनी मार्गदर्शन केले. किशाभाऊ आणि इतर ज्येष्ठांच्या सान्निध्यातले, वर्धक दशेतील अनुभव, व्यावसायिक जीवन, त्यानंतर संभाजीनगर येथे पूर्ण वेळ काम आणि सध्याची कार्यवाह पदाची जबाबदारी हा प्रवास सर्वांसमोर उलगडला. समाजाला वेगवेगळ्या क्षेत्रात नेतृत्व देणं हेच वर्धिनीचं काम आहे. त्यामुळे केवळ कार्यकर्ते बनण्यापेक्षा नेते बना. त्यासाठी दररोजचा व्यायाम, शाखेचा परीघ ओलांडून नवनव्या गोष्टी बघणं, प्रतिकूल आणि अनुकूल दोन्ही परिस्थितीत काम करत राहणं यातूनच खरे नेतृत्व तयार होते असे मत सरांनी मांडले. सदर मुलाखत श्री. अरविंद केळकर यांनी घेतली.

वर्धिनी विचार आणि जीवित ध्येय या अभ्यासवर्गाच्या मुख्य विषयांची संकल्पना युवकांना आत्मसात झाली का नाही हे समजून घेण्यासाठी प्रश्नावली भरून घेण्यात आली.

## पाकोळी बालवाडी

२ ऑक्टोबर गांधी जयंती दूरदृष्य प्रणालीने (Online) साजरी झाली. मुलांना गांधीजींची गोष्ट व माहिती शिक्षिकांनी सांगितली. मुलांनी उस्फुर्तपणे घोषणा दिल्या.



अश्विन शुद्ध प्रतिपदेला घटस्थापनेचा व्हिडीओ गटावर पाठवला. त्यावरून मुलांनी घरी धान्य पेरले आणि त्याचे रोजचे निरीक्षण करून ताईंना सांगितले. उपवासाचे दिवस म्हणून ताक करण्याचा आणि फुलांच्या माळा ओवण्याचा पाठ घेतला. काही मुलांनी घटाची माळ करण्यास आजीला मदत करतानाचे फोटो पाठवले आहेत.

खंडेनवमीला शिक्षिकांनी वर्ग सजावट केली. फळ्यावर देवीची प्रतिमा, अंकांची सरस्वती काढून, प्रत्येक गटाचे शैक्षणिक साहित्य मांडून पाटीपूजन केले. देवीची आरती, गाणी, श्लोक म्हटले. ह्याचे फोटो गटावर पाठवले. मुलांनी दसऱ्याच्या दिवशी अशी पूजा आपापल्या घरी केली.



दिवाळीनिमित्त आकाश कंदील तयार करणे, पणती रंगवणे, टाकाऊ वस्तू पासून टिकाऊ वस्तू बनवणे असे उपक्रम दूरदृष्य प्रणालीद्वारे (Online) घेण्यात आले. मुलांनी घरी किल्ला तयार केला, आकाशकंदील करून दारात लावला, रांगोळ्या काढल्या. याचे फोटो शिक्षक गटावर पाठवले.

दिवाळीनंतर शिक्षकांना भेटण्यासाठी पालक व मुले शाळेत येत होती. वर्गातील साधनांशी खेळून ताईंशी गप्पा मारून आम्हाला पण शाळेत बोलवा ना असे सांगत होती. यातून शिक्षकांना वेगळाच आनंद मिळाला.



## भावपूर्ण श्रद्धांजली

- 'स्व'-रूपवर्धिनीचे देणगीदार श्री. गोविंदराव भागवत यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

**परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.**
**वर्धिनीचा परिवार या सर्वांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.**